वर्ष ४३ अंक ५

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ ॥ मराठी तितुका मेळवावा ॥

On the web www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

मे २०२३

## अध्यक्षीय



प्रिय मित्रमैत्रिणींनो,

'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात श्री. प्रकाश भालेराव यांच्या हस्ते नारळ फोडून बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या (बीएमएम) २०२४ अधिवेशनाची घोषणा बे एरियामध्ये अक्षय तृतीयेच्या दिवशी झाली! मी व माझ्या समितीमधील सचिव अजित नातू व खजिनदार राजन पेडणेकरदेखील उपस्थित होते.

प्रिय मित्र प्रकाश भालेराव यांच्या जबरदस्त नेतृत्वाखाली, अजय पटवर्धन, मंगेश जोशी व भास्कर रानडे या 'एम एम बी ए'च्या टीमने आमचे अतिशय मनापासून आगत्य केले. मला सांगायला अतिशय आनंद होतोय, की उत्तर अमेरिकेतील आपल्या सगळ्यांच्या स्वागतासाठी अख्खी बे एरिया जय्यत तयारीला लागली आहे!

बीएमएम २.० वर आधारित काही महत्त्वाचे बदल आपण अधिवेशनातही घडवून आणत आहोत. सर्वात महत्त्वाचं म्हणजे सर्व पॅकेजेस आणि तिकिटे मंडळांना पाच टक्के Discountने मिळतील. उदाहरणार्थ $१५,०००चे पॅकेज मंडळांना $१४,२५० ला मिळेल. या सवलतीचा वापर मंडळांनी आपले सभासदत्व वाढवण्यासाठी करावा अशी अपेक्षा आहे.

बीएमएम २४ अधिवेशनाची मशाल आम्ही प्रत्येक मंडळातून नेणार आहोत! या मशाल-सोहळ्यात आम्ही मंडळाची कार्यकारिणी, अधिवेशनात कार्यक्रम करण्यास उत्सुक असलेले स्थानिक कलाकार, मदत करू इच्छिणारे स्वयंसेवक, येऊ इच्छिणारे सदस्य आणि बीएमएम डोनर्स यांच्याशी संवाद करणार आहोत.

२०२४चे अधिवेशन हे आपल्या सगळ्या मंडळांचे आहे. त्यात भाग घेण्याची संधी प्रत्येक मंडळाला मिळणारच. २०२४ला अजून एक वर्ष आहे. त्या अगोदर येत्या जुलैमध्ये डीसी आणि सिॲटल मंडळे बीएमएम-२०२३-मैत्री-मेळावे करण्यास सज्ज होत आहेत. सगळ्यांनी मैत्री- मेळाव्यात भाग घ्यायचा आहे बरं का?

बाकीच्या प्रकल्पांबद्दल थोडक्यात: बीएमएम शाळेच्या मुलांच्या परीक्षेची तयारी जोरदार चालू आहे. आतापर्यंत ३४ शाळांमधून ७४० मुलांनी परीक्षेसाठी नोंदणी केलेली आहे. बीएमएम क्रिकेटच्या टेक्सास प्रादेशिक मॅचेस मे च्या पहिल्या आठवड्यात ह्युस्टन येते भरत आहेत. मिलिंद ओकचा 'प्रभात ते सैराट' बीएमएम दौरा सुरू झाला आहे. सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये आपण प्रशांत दामले निर्मित, संकर्षण कऱ्हाडे यांचे 'नियम व अटी लागू' हे नाटक नक्की केले आहे. त्यातील कलाकारांचे व्हिसा प्रोसेसिंग सुरू झाले आहे. बीएमएम युवा इंटर्नशिपचे आयोजन/इंटरव्ह्यू सुरू आहे. बीएमएम एज्युकेशनल एन्डावमेंट फंडमध्ये $१०,००० जमले आहेत. गेल्या तीन महिन्यात झालेल्या कामाची सविस्तर माहिती बीएमएम ॲप मध्ये आहेच. त्यासाठी संकेतस्थळ- https://bmm2.page.link/bmmapp

नेहमीप्रमाणे एका श्लोकाने थांबतो:

प्रकृते: महान तत्: अहंकार: तस्मात् गणश्च षोडशक: ।
तस्मादपि षोडशकात् पंचभ्य: पंच भूतानि ।।

(अर्थ- From प्रकृती evolves महत. From that अहंकार. From that a set of sixteen (eleven sense organs and five तन् मात्र). From five of sixteen (तन् मात्र) evolve पंचमहाभूते (आकाश, पृथ्वी, पाणी, वायू, अग्नी).

शुभेच्छा!

**संदीप दीक्षित (अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ २०२२-२४)**
Phone: +1 216-926-6696
sandeep.dixit@bmmonline.org
twitter.com/sandeepsdixit
www.bmmonline.org
https://bmm2.page.link/bmmapp
#bmm2 #communityCentricBMM
#mandalMember #vruttaSubscriber

***

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**
**संस्थापक**:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** -विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:-**
vrutta@bmmonline.org
**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय -संपर्क:-**
**BMM Treasurer -** Rajan S Pednekar
20611 Whitebud CT. Tampa FL 33647
Ph- 813-546-1330 Email- Rajan.Pednekar@bmmonline.org

**वर्गणीचे दर:- Printed Copy: $25/ year**
Subscription payment is accepted online by Paypal at:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription
**जाहिरातींचे दर**
पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50
वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२० तारखेपर्यंत** हाती आलेल्या मजकुरातून **निवडक** मजकूर नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो **युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा.**
**प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही.**
लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.
पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२-२०२४)**
**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष:-** | संदीप दीक्षित | क्लीव्हलँड ओहायो |
| **सचिव:-** | अजित नातू | सॅक्रॅमेण्टो, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष:-** | राजन पेडणेकर | टॅम्पा बे, फ्लोरिडा |
| **सदस्य:-** | अमर उन्हेकर | लिव्हिंग्स्टन, न्यू जर्सी |
| | सविता मोरे | सिॲटल, वॉशिंग्टन |
| | मंजुषा नाईक | वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| | प्रसाद पानवळकर | ऑस्टिन, टेक्सस |
| | विराज राऊत | सॅन होजे, कॅलिफोर्निया |

**मताधिकार नसलेले (नियुक्त) सदस्य**
**माजी अध्यक्ष:-** विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय
**वृत्त संपादक:-** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय


**विश्वस्त समिती:**
**अध्यक्ष :-** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन
**सदस्य :-** नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
**सदस्य :-** सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट
...
**प्रकाशक:-** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
**संकेतस्थळ:-** https://www.bmmonline.org
**इमेल:** vrutta@bmmonline.org
Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

# या अंकात

| | पान क्र. |
|---|---|
| - अध्यक्षीय | १ |
| - श्रध्दांजली | २ |
| - बृ.म. मंडळ अधिवेशन, बे एरिया- २०२४- वार्ता | ३ |
| - लेख:-पॉडकास्ट कथा बीएमएम | ४ |
| - लेख:- फिटनेसोत्सव २०२३ | ५ |
| - बृ. म. मंडळ प्रकल्प वारसा- भाग ५ | ६ |
| - कविता:- महाराष्ट्र माझा | |
| - कीर्तनसेवा | ७ |
| - लेख:- कारगाथा २: विक्रेत्यांच्या नाना तऱ्हा | ८ |
| - कविता:- आई | ९ |
| - 'शब्दफोड'- मराठी भाषकांसाठी मनोरंजनाचा खेळ | १० |
| - पुरवणी ऑनलाईन:- लेख-एक नवीन 'Wordle' राशिभविष्य मे २०२३ | |
| - Business Advertisement | ११ |
| - बृ.म. मंडळाचे काही प्रकल्प पृष्ठ ६ आणि ......... | १२ |

# १ मे महाराष्ट्रदिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा!

# श्रध्दांजली



पहिल्या आणि नंतरच्या दोन 'रंगदीप' दिवाळी अंकाचे मुद्रक व आमचे स्नेही **शरद जोगल** यांचे २९ मार्च २०२३ रोजी पुण्याला दुःखद निधन झाल्याची बातमी प्रभाकर साठे यांनी कळवली आणि मनस्वी वाईट वाटलं. मराठी विश्व, न्यू जर्सी व महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क संयुक्त, गेल्या वर्षी प्रकाशित 'रंगदीप' दिवाळी अंकात मी त्यांच्यावर लेख लिहिला होता; म्हणून शरद खुष होते. गेली कांही वर्ष स्वतःची तब्येत बरी नसताही वयाच्या नव्वदीत ते एकट्याने पुण्याला जाण्यापूर्वी फोनवर म्हणाले, "जयंत, मी सहा महिन्यासाठी पुण्याला जात आहे. जमल्यास माझ्या आयुष्यात राहिलेल्या सर्व इच्छा मी यावेळी पूर्ण करून येणार आहे. माझा देवावर पूर्ण विश्वास आहे. येथे आल्यावर फोन करीन..." हा शरद यांचा माझ्याशी झालेला शेवटचा संपर्क! मला वाटतं, त्यांना मृत्यूची चाहूल लागली होती आणि पुण्याच्या घरी/बंगल्यात शेवटचा श्वास घ्यायचा होता... असो.

शरद जोगल यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**- जयंत विठ्ठल कुळकर्णी** (न्यू यॉर्क)

***

# बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, बे एरिया २०२४ - विषयक वार्ता

**- अनिता कांत** (बे एरिया, कॅलिफोर्निया)



बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या (बृ.म.मं.) २०२४ साली बे एरिया येथे भरणाऱ्या अधिवेशनाच्या कामाने चांगलाच वेग पकडला आहे. या अधिवेशनासाठी २०हून अधिक समित्या स्थापन झाल्या असून त्यांच्या चमूंनी सूत्रबद्ध मांडणीस सुरुवात केली आहे. या चमूच्या प्रमुखांच्या दर रविवारी बैठका होत असून त्यात आत्तापर्यंत झालेल्या कामाचा आढावा घेतला जात आहे. एप्रिलच्या ९ तारखेला या समूहाला संबोधून बृ. म. मंडळ २०२४च्या अधिवेशनाचे आयोजक श्री प्रकाश भालेराव यांनी आगामी अधिवेशनाच्या कामासंबंधी माहिती दिली. तसेच श्री. अजय पटवर्धन यांनी आपापल्या कामात सुसूत्रता आणण्यासाठी Agile पद्धतीचा वापर कसा करावा याबद्दल मार्गदर्शन केले. महाराष्ट्र मंडळ बे एरियाचे अध्यक्ष श्री. भास्कर रानडे यांनी सभेचे सूत्रसंचालन केले.



**समिती प्रमुखांची बैठक**

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या आगामी अधिवेशनातील भोजन व्यवस्थेच्या चमूने पुढच्या काही महिन्यात विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. त्यातील पहिली स्पर्धा महाराष्ट्र मंडळाच्या वसंतोत्सवाच्या दरम्यान एप्रिल ८ रोजी उत्साहाने पार पडली. स्पर्धकांनी (डेअरी) दूध किंवा नारळाचे दूध यांचा वापर करून तयार केलेले अभिनव आणि रुचकर असे गोड पदार्थ परीक्षणासाठी आणले होते. प्रथम क्रमांक पटकावला सौ. श्रावणी बिनीवाले यांनी; आणि दुसरा क्रमांक मिळवला सौ. शुभदा नारकर यांनी! सौ. अनुराधा भंडारी आणि सौ. वसुधा पटवर्धन यांनी स्पर्धेचे आयोजन केले होते. सौ. सुजाता भालेराव, सौ. मोनिका मुटाटकर आणि सौ. निर्मल  गोसावी यांनी परिक्षणाची जबाबदारी पार पाडली.



**अंतिम फेरीतील स्पर्धक**



**परीक्षक - पदार्थांची चव घेताना**

**पहिल्या क्रमांकाची पाककृती →**



# पॉडकास्ट - कथा बीएमएम

- **सौ. प्रगती नाडकर्णी** (बी एम एम पॉडकास्ट टीम)

२ मार्च, २०२३ गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर बीएमएम २.० अंतर्गत बीएमएम शाळा विभागाने पॉडकास्ट 'KathaBMM'- ऑडिओ (श्राव्य) एक नवा उपक्रम सुरू केला. यावर लहान मुले, शालेय विद्यार्थी यांसाठी सुंदर सुंदर गोष्टी ऐकण्यासाठी उपलब्ध आहेत. नवीन युगाचे बदल स्वीकारत, नव्या रीतीने ज्ञानाची साधने आणि आपल्या भाषावाङ्मयाची ओळख करून देण्यासाठी हे नवे दालन 'कथा बीएमएम पॉडकास्ट'च्या स्वरूपात उघडले आहे. तुम्हाला प्रश्न पडला असेल की यूट्युब, टीव्ही इत्यादी साधने असताना हे पॉडकास्ट का?




सध्याच्या दृक्श्राव्य माध्यमात 'श्राव्य' म्हणजे 'ऐकणं' थोडंसं मागे पडत चाललंय. दृक् म्हणजे दृश्य स्वरूपात उपलब्ध असलेल्या माध्यमांची जणू काही जत्रा भरली आहे. ज्यात मनोरंजन जास्त आणि शिक्षण कमी अशीही अवस्था आली आहे. म्हणून कथा आणि गोष्टी, कहाण्या या फार महत्त्वाच्या आहेत. आता गोष्ट, आणि ती ऐकायचीच, का बरं? जेव्हा समोर काहीतरी पाहायला उपलब्ध असतं, जे चालणारं, बोलणारं, फिरणारंही असतं, तेव्हा त्यातल्या गोष्टीतील शब्द व त्यातून मिळणाऱ्या शिकवणुकीकडे लक्ष कमी होतं. जे दाखवले जातेय ते तसंच मनावर ठसतं. इथे स्वतःच्या कल्पनाशक्तीला शून्य वाव असतो. मात्र गोष्ट ऐकताना श्रोता आपल्या कल्पना-शक्तीचा वापर करून त्यानुसार ती मनावर साकारतो. यात शब्द हे एकच माध्यम असल्याने ते स्मरणात पक्के होतात.

साहित्याशी नातं जोडून ठेवणे हे एका सांस्कृतिक वृक्षाच्या मुळाशी फांद्यांनी आणि पानांनी जोडून राहण्यासारखा आहे. भारतीय संस्कृतीत गोष्ट, कथा, कहाण्या यांना खूप महत्त्व आहे. वेगवेगळ्या परंपरा, रीती याविषयी आपण कहाण्यांच्या स्वरूपात लहानपणापासून ऐकत आलो आहोत. श्रीकृष्णाने सुद्धा अर्जुनाला गीता सांगितली. पूर्वीच्या काळी ऋषीमुनी वेगवेगळ्या कथांच्या स्वरूपातच आश्रमात ज्ञान देत असत. आजीआजोबा, वडीलधाऱ्यांनी सांगितलेल्या गोष्टी ऐकून लहान मुलांनी झोपावं हा रिवाज वर्षानुवर्षे घराघरातून चालत आला आहे. कथांचा सर्वात मोठा स्रोत म्हणजे कीर्तन. अमूल्य संत वाङ्मय हे कथा व गीत स्वरूपात सर्वसामान्यांपर्यंत कीर्तनकारांनी पोहोचवलं. अजूनही ते तसंच चालू आहे.

प्रत्येक कथा आपल्या लालित्याने वेगवेगळे शब्द, रचना, लय, उच्चार घेऊन येते. ऐकणाऱ्याची भाषा आणि शब्दसंपत्ती समृद्ध करत जाते. उदाहरणार्थ आजकाल तुम्ही स्क्रीनवर बघत असलेली व्हिडिओ व अल्बम मधली गाणी तुमच्या किती लक्षात राहतात? आणि पूर्वी रेडिओवर ऐकलेली किती गाणी तुमच्या लक्षात आहेत? उत्तर तुमच्या स्वतःकडूनच मिळाले असेल. आपल्या मुलांची भाषा, शब्दसंपत्ती आणि त्याबरोबरच स्मरणशक्ती वाढवण्यासाठी गोष्टी ऐकणं हे उत्तम टॉनिकच! म्हणून गोष्टी ऐकण्यासाठी "बीएमएम कथा" हे ऑडिओ पॉडकास्ट. आता जरा ऑडिओ पॉडकास्टचे फायदे बघूयात.

पहिला फायदा म्हणजे वेगवेगळ्या गॅजेटवर सारखे सारखे काहीतरी बघत व्यस्त असणाऱ्या डोळ्यांना आराम मिळतो. काही हातात घेऊन बघत बसायचं नसतं. कारमधून जाताना, स्वयंपाक, लाँड्री करताना, मुलांच्या वेगवेगळ्या ॲक्टिव्हिटीज, गेम्स बघताना कुठेही ऐकू शकता. सर्वात महत्त्वाचं म्हणजे रात्री तुमच्या लाडक्या बाळाला झोपवताना तुम्ही थोपटण्याचा काम करा आणि गोष्ट ऐकवण्याचे काम पॉडकास्ट करेल.

आता तुमच्यापैकी काहींना प्रश्न पडला असेल, की पॉडकास्ट आणि ऑडिओ पॉडकास्ट म्हणजे नक्की काय? तर पॉडकास्ट हा एक प्लॅटफॉर्म आहे. एक ॲप्लिकेशन, ॲप आहे. रेडिओ स्टेशन लावून तुम्ही कार्यक्रम ऐकता तसेच पॉडकास्ट ॲपवर किंवा दिलेल्या लिंक वर क्लिक केलं, की तिथे तुम्हाला गोष्टींची यादी मिळते. त्यातली हवी ती गोष्ट तुम्ही क्लिक करून ऐकू शकता. हे तुम्ही फोनवर, तुमच्या संगणकावरही लावू शकता. तुम्ही म्हणाल इथेही गॅजेटआलेच की! खरंय, गॅजेट्स हे आपल्या जीवनाचे अविभाज्य घटक झालेले आहेत. फोन म्हणजे आपल्या देहाला जणु नवीन जोडलेला अवयव! तर हा पॉडकास्ट म्हणजे नवा रेडिओच म्हणा ना! हा डाउनलोड करावा लागतो का? तर नाही. पाठवलेल्या लिंकवर क्लिक करून किंवा फोन अथवा लॅपटॉपच्या 'search' बॉक्समध्ये पॉडकास्टचे नाव घातले, की लिंक मिळू शकते. बीएमएम तर्फेदेखील तुम्हाला ही लिंक मिळू शकेल. फोनवर स्पॉटिफाय किंवा अँकर या ॲपमध्ये सर्च बॉक्समध्ये 'कथा बीएमएम' नाव टाकलं, की तिथेही हा पॉडकास्ट मिळेल आणि या गोष्टी ऐकता येतील.

हे पॉडकास्ट सर्वपरिचित कै. पांडुरंग सदाशिव साने अर्थात साने गुरुजी यांच्या 'श्यामची आई' या पुस्तकाने सुरू केले आहे. अतिशय सुंदर, साध्या, सोप्या रीतीने एका लहान मुलाच्या आयुष्यातले आईशी असलेले नाते या पुस्तकाद्वारे ४२ रात्री सांगितलेल्या गोष्टींमधून उलगडत जाते. यासाठी अतिशय उत्साही व उत्तम वाचक बीएमएम पॉडकास्ट टीमच्या आवाहनानुसार पुढे आले आणि दर आठवड्याला 'श्यामची आई' या पुस्तकातील तीन गोष्टी सुश्राव्य स्वरूपात पॉडकास्टवर उपलब्ध होत आहेत.

८२ वर्षांपूर्वी लिहिलेल्या गोष्टी आजही आपल्याला ऐकत राहाव्याशा वाटतात. भारताबाहेर राहणाऱ्या मुलांसाठी त्या काळातली भाषा व शब्द थोडेसे सुलभ, सहज समजणारे करून या गोष्टी वाचल्या आहेत. केवळ मुलांसाठी साहित्य विषयक प्रकल्प आहे, असे म्हटल्याबरोबर 'साधना प्रकाशन'ने बीएमएमला हे पुस्तक वाचण्याची परवानगी दिली.

बीएमएम २.०च्या 'कथा बीएमएम पॉडकास्ट' निर्मितीचे काम श्री. राहुल देशमुख, श्री. प्रवीण पिंगळे, सौ. शर्मिष्ठा गाडगीळ, सौ. प्रगती नाडकर्णी, सौ. बकुल गोडबोले आणि सौ. वसुंधरा पर्वते या टीमने केले. त्यांना बीएमएम 2.0 चे अध्यक्ष श्री. संदीप दीक्षित, कार्यवाह श्री. अजित नातू, खजिनदार श्री. राजन पेडणेकर, मराठी शाळा विभाग प्रमुख सौ. सविता मोरे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाल्याने हा प्रकल्प अगदी थोड्या अवधीत उत्तम रीतीने उभा राहिला. यातील तांत्रिक भाग सध्या श्री. प्रवीण पिंगळे व श्री. राहुल देशमुख हे सांभाळत आहेत. ४०च्या वर वाचक पहिल्या पॉडकास्ट प्रकल्पासाठी उर्वरित टीमच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत. पहिल्या २-३ आठवड्यांचा श्रोत्यांचा प्रतिसाद उल्लेखनीय आहे.

या उपक्रमात, यापुढेही उत्तम साहित्य मुलांसाठी उपलब्ध करून देण्याची तयारी सुरू आहे. यात संत वाङ्मय, लोककथा, पुराणातील कथा आणि पारंपरिक कथा यांचाही समावेश असणार आहे. या उपक्रमामुळे शालेय विदयार्थी तसेच बाल-वयोगटातील मुलामुलींना भाषाशिक्षणास आणि मनोरंजनासाठी चांगला उपयोग होईल.

बालवयोगटावरच न थांबता प्रौढ श्रोत्यांसाठीही दर्जेदार पुस्तके पॉडकास्ट द्वारे श्राव्य स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी बीएमएमची टीम कार्यरत आहे. लिंक-

https://podcasters.spotify.com/pod/show/kathabmm

***

# *फिटनेसोत्सव २०२३*

**- निरंजन देव** (ग्रीन ब्रूक, न्यू जर्सी)



नमस्कार!

आपल्या सर्वांनाच एकत्र येऊन सोहळे साजरे करायची आवड असते; गणपती असो वा दिवाळी किंवा नाट्यमहोत्सव, आपल्या मित्र-परिवारासोबत हे सर्व साजरे करण्यात एक वेगळीच गंमत असते.

चला तर मग यावर्षी एकत्र येऊन साजरा करूया फिटनेसोत्सव, जेणेकरून आपल्याला आयुष्यातील इतर अनेक उत्सव अधिकाधिक वर्षे साजरे करता येतील.

*बृहन्महाराष्ट्र मंडळ आपल्यासाठी घेऊन येत आहे, फिटनेसोत्सव २०२३!*

Community Outreach Program (समाजापर्यंत पोहचण्याचा कार्यक्रम)च्या अंतर्गत "Outdoor" Events हा उपक्रम सुरू झाला आहे. ह्या "Outdoor" कार्यक्रमांतर्गत आम्ही वर्षभरात बरेच उपक्रम- हायकिंग, कॅम्पिंग आणि नेहमीचेच यशस्वी Half or Full मॅरेथॉन आयोजित करीत आहोत. हे सर्व यशस्वी होण्यासाठी आम्हाला आपल्या साहाय्याची व सहभागाची अतिशय आवश्यकता आहे.

"Outdoor" मधला आमचा पहिला कार्यक्रम आहे "५k for ५K" - महाराष्ट्र दिनानिमित्त 5K धावण्याचा किंवा चालण्याचा कार्यक्रम: आम्ही उत्तर अमेरिकेतील सर्व मंडळ सदस्यांना २०२३च्या महाराष्ट्र दिनी (शनिवार, एप्रिल २२ - रविवार २९ मे या दरम्यान), संयुक्तपणे ५,००० किलोमीटरचा पल्ला धावून किंवा चालून पूर्ण करण्याचे आवाहन करीत आहोत. यासाठी कमीत कमी १,००० स्पर्धकांची आवश्यकता आहे. ५० मंडळातून प्रत्येकी २० खेळाडू जरी सहभागी झाले, तरी हे ध्येय पूर्ण करणे सहज शक्य आहे.

*BMM 2.0 Outdoors Participation* Sign-up: https://bmm2.page.link/outdoor आपल्या मंडळाच्या 'आऊटडोअर्स टीम लीड'शी संपर्क करून स्थानिक कार्यक्रमाबद्दल अधिक माहिती करून घ्या. आपल्या मंडळात आऊटडोअर्स टीम लीड नसल्यास खालील प्रतिनिधींशी 'व्हॉट्सअॅप'वर संपर्क साधा.

निरंजन देव: ७३२-८५०-२७२० , मिलिंद पाटील: ४६९-२५८-०६८७ , विठ्ठल कुलकर्णी: ६३१-८८९-०७३५ .

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष, संदीप दीक्षित, तसेच Community Outreach Program Lead प्रसाद पानवळकर यांच्या नेतृत्वाखाली गेले काही महिने आम्ही उत्तर अमेरिकेतील अनेक मंडळांशी संपर्क साधत आहोत. उत्तर अमेरिकेतील २० मराठी मंडळं या कार्यक्रमात सहभागी होत आहेत. यात तुमचे मंडळ नसेल तर तुमच्या मंडळाच्या प्रतिनिधीलादेखील सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करा.

चला तर, सर्वांनी एकत्र येऊन साजरा करूया हा एक सार्वजनिक फिटनेसोत्सव!

***

## बृहन्महाराष्ट्र मंडळाचा प्रकल्प - 'वारसा'

**YouTube मालिका**

आजचा उत्तर अमेरिकेतील मराठी समाज कोण आहे हे समजून घ्यायचे असेल तर आपण कुठून आलो, का आलो, आणि इथल्या मातीत आपली मूळे रोवून कसे भरभराटीला आलो, हे शोधलं पाहिजे, त्याची नोंद करून, ते जतन केलं पाहिजे. अशा गोष्टी एकत्रित केल्या, की सर्वांना आणि भावी पिढीला आपल्या प्रवासाची झलक मिळेल. त्यासाठी चालू केला आहे, "वारसा" हा प्रकल्प.



**वारसा मालिका, भाग पाचवा**

**" माझ्या गोव्याच्या भूमीत..."**

**श्री. रवि गावकर,**

**अमेरिकेत स्थलांतर १९६६**

गोवा पोर्तुगीज सत्तेखाली असताना, एकही शाळा नसलेल्या, ओपा ह्या छोटयाशा गावात बागाईत कुटुंबात रवि गावकरांचा जन्म झाला. विद्येच्या आकांक्षेने आपल्या कष्टांनी आणि जिद्दीने त्यांनी शिक्षण घेतले. मॅट्रिक होईपर्यंत वयाची २१ वर्षे होऊन गेली, तरी बोर्डातला नंबर काही त्यांनी चुकवला नाही. वाढलेल्या वयामुळे आणि घरच्या परिस्थितीमुळे आलेल्या अडचणींना तोंड देऊन इंजिनीरिंगच्या उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत आले आणि यशस्वी उद्योजक म्हणून त्यांनी नाव मिळवले. क्लीव्हलँड मधील मराठी मंडळ, भारतीय शास्त्रीय संगीत संस्था, शिव-विष्णू मंदिर ह्या सर्व उपक्रमात त्यांचा पुढाकार होता. आता शिकागोत किंवा पूर्वी क्लिव्हलँडमध्ये राहिलेल्या रवींचं मन अजून त्या गोव्यातच घुटमळतं. बा. भ. बोरकरांच्या कवितेतील ओळी त्यांच्या आयुष्याला चपखल बसतील अशा आहेत.

'माझ्या गोव्याच्या भूमीत, सारा माझा जीव जडे
पुरा माझ्या कवनांचा, गंध तेथे उलगडे'

आपल्या धडाडीने व कर्तृत्वाने ओपा पासून अमेरिकेपर्यंत केलेल्या त्यांच्या प्रवासाची कहाणी त्यांच्याकडूनच ऐकूया, ह्या सत्रात. त्यासाठी खालील दुव्यावर क्लिक करा. किंवा तुमच्या मोबाईल फोनवरून इथे दिलेला QR code scan करा. खाली दिलेल्या YouTube channel ला जरून like व subscribe करा.

**Episode 5 -**
**" माझ्या गोव्याच्या भूमीला"**

**Past Episodes :-**
**https://www.youtube.com/@bmm-varasa**

***

## महाराष्ट्र माझा

**- शैलेश पोतदार** (डॅलस, टेक्सस)



मराठी माझी मायबोली, मराठी बाणा माझा
मराठीसाठी जन्म अमुचा, प्रणाम तुजला माझा
जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र हा माझा |

ही मराठी माती धन्य
आम्हासी वंद्य
लागते पुण्य
जनन व्हायासी सत्य,
येथे जणू सात स्वर्ग नांदती हो जी जी ...
जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र हा माझा |

आळंदी, जेजुरी, पंढरी, प्रयाग, काशी अमुची
सह्याद्रीचे उंच कडे मम हिमशिखरांसम साची
गडकिल्ल्यांचे भूषण आम्हा, मान महाराष्ट्राचा
जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र हा माझा |

भीमा गोदा तापी, गंगे यमुने सम आम्हासी
नामा, तुकया, ज्ञानेशाची भूमी वंद्य जगासी
उद्घोष मराठी सारे साथी करती महाराष्ट्राचा
जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र हा माझा |

...

टीप:- १ मे, २०२३, महाराष्ट्र दिनी Music Amusers Entertainment ह्या यूट्यूब वाहिनीवर 'महाराष्ट्र माझा' हे नवीन गीत प्रदर्शित होत आहे.
निर्मिती, गीत व संगीत- **शैलेश पोतदार**
गायक: **शाहीर नंदेश विठ्ठल उमप**
या सादरीकरणाच्या निर्मितीत **असंख्य मित्रमंडळींचा** हातभार लागला. त्यांची **नामावली** व गीताचे सादरीकरण खालील दुव्यावर:- **https://youtu.be/7lyKuM4HBKY**

***

## BMM BCONNECT

Sign-up link:-**https://bmm2.page.link/bconnect**
and join the LinkedIn using the link:-
**https://www.linkedin.com/groups/12709200**

# कीर्तनसेवा

- **नितीन बर्वे** (सॅन फ्रान्सिस्को, कॅलिफोर्निया)

नाहं वसामि वैकुंठे | योगिनां हृदयो न च |
मद्भक्त यत्र गायंति | तत्र तिष्ठामि नारद ||

श्रीमद्भागवत ग्रंथात स्वतः भगवान विष्णू देवर्षी नारद मुनींना सांगत आहेत, की भक्तांना मला जर भेटायचे असेल तर मी वैकुंठात असेनच असे नाही, योगियांच्या साधनेमध्ये असेनच असे नाही; पण जिथे भक्त**जन** एकत्र येऊन माझे गुणगायन करीत असतील तिथे मी तिष्ठत उभा असेन. असे गुणगायन ज्या भक्तीद्वारे होते अशा कीर्तन भक्ती संबंधी माहिती देणारा हा लेख.

कीर्तन म्हणजे आपल्या शास्त्रात सांगितलेल्या नवविधा भक्तींमधील एका अत्यंत प्रभावी प्रकार आहे व यात नारदीय, वारकरी, दासगणू, रामदासी अशा विविध परंपरा आहेत. विविध परंपरेतील कीर्तने आपल्यापैकी बरेच लोक लहानपणापासून ऐकत आले आहेत. एखादा कीर्तनकार आपले वक्तृत्त्व, गायन, मुद्रा अभिनय अशा विविध कलांनी ठासून भरलेले कीर्तन जेव्हा सादर करतो, तेव्हा जमलेल्या सर्व भक्तांना सामुदायिक भक्तीचा लाभ व वेगळाच सात्त्विक आनंद होतो, असा सर्वांचाच अनुभव आहे. पण काळानुसार ही समृद्ध कीर्तन परंपरा लोप पावत आहे असे आपल्याला दिसून येते. आपला संस्कृतीचा हा ठेवा जपून ठेवून त्याचा भारताबाहेर व पुढील पिढ्यांपर्यंत प्रचार व प्रसार करावा या सद्भावनेने **ह. भ. प. (हरिभक्त परायण) सौ. रश्मी बर्वे** यांनी गेले काही वर्षे कीर्तन सेवा कॅलिफोर्निया, मुंबई, पुणे, ऑस्ट्रेलिया अशा विविध प्रांतातील भक्तांकरिता सादर केली आहे.



ह. भ. प. सौ. रश्मी बर्वे ह्या मूळच्या विले-पार्ले (मुंबई) येथील असून २००१ पासून त्यांचे अमेरिकेत वास्तव्य आहे. त्या ब्रह्मचैत्यन्य श्री गोंदवलेकर महाराज ह्यांच्या अनुग्रहित आहेत. त्यांच्या आजी ह. भ. प. कै. सत्यभामाबाई फडके ह्यांच्याकडून त्यांना नारदीय कीर्तन-सेवेचा वारसा मिळाला आहे.

दादर (मुंबई) येथील अखिल भारतीय कीर्तन संस्थेतून त्यांनी **कीर्तन विशारद** पदवी मिळवली आहे. आपल्या उज्ज्वल संस्कृतीची जपणूक व पुढील पिढीला प्रबोधन ही त्यांच्या कीर्तन-सेवेची मुख्य उद्दिष्टे आहेत.

फेब्रुवारी २०२३ मध्ये आपले सद्‌गुरू श्री. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांची जयंती व 'एकनाथषष्ठी'चा योग साधून सौ. रश्मी बर्वे ह्यांनी सॅन होजे (कॅलिफोर्निया) येथील प्रसन्न गणेश मंदिर येथे नारदीय परंपरेतील कीर्तनसेवा सादर केली. यामध्ये त्यांनी पूर्वरंगात "अवघाचि संसार सुखाचा करीन..." हा संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा अभंग निरुपणास घेऊन आपल्या जीवनात ध्येय व उद्दिष्टये यातील फरक काय आहे आणि दोन्हींचे महत्त्व काय आहे, तसेच सुख व आनंद यातील मूलभूत फरक यावर चिंतन केले.

या निरुपणात त्यांनी आपल्या अमेरिकेतील दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन जमलेल्या भक्तांपर्यंत संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा संदेश अत्यंत सहजरीतीने पोचवला. कीर्तन करताना त्यांनी आर्या, दिंडी, साकी अशा मराठी भाषेतील वैशिष्ट्यपूर्ण वृत्तांचा वापर करून आपल्या मातृभाषेचे सौंदर्य उलगडून दाखवले. पूर्वरंग आणि उत्तररंग यामध्ये सर्व भक्तांनी केलेल्या "जय हरी विठ्ठल, जय हरी विठ्ठल" गजराने सभा मंडप दुमदुमून गेला.

त्यानंतर उत्तररंगात सौ. रश्मीताई यांनी संतश्रेष्ठ जनाबाई यांचे अद्भुत असे चरित्र रंगवून सांगितले. त्यात संत जनाबाई यांचे अत्यंत खडतर पण सात्त्विक असे बालपण, त्यांची संत नामदेव यांच्याशी भेट व श्री पांडुरंगाने दिलेले सगुण दर्शन असे विविध प्रसंग नाट्यमय पद्धतीने, सुंदर दृष्टांत व विनोद याचा योग्य वापर करून वर्णन करताना जमलेले भक्त पूर्णपणे रंगून गेले होते. आपल्या प्रखर भक्तीच्या सामर्थ्यामुळे जनाबाई ह्यांनी परमेश्वराची कृपा कशी करून घेतली, तो प्रसंग सौ. रश्मीताई ह्यांनी सर्व भक्तांच्या डोळ्यापुढे उभा केला. आपल्या सारख्या अमेरिकेतील विविध पिढ्यांतील भक्तांना आदर्श असे संत जनाबाई यांचे चरित्र व कीर्तनसेवेद्वारे कलियुगात सर्वात प्रभावी व योग्य असे नामस्मरण भक्तीचे महत्त्व भक्तांच्या अंतःकरणात रुजवले. ह्या कीर्तन सेवेची सांगता परंपरेप्रमाणे भैरवी व आरती करून झाली. भविष्यात सद्गुरुंच्या कृपेने अशीच कीर्तन-सेवा सौ. रश्मी ताईंकडून घडावी ही प्रार्थना!

।। जय जय रघुवीर समर्थ ||

***

# कारगाथा - २ : विक्रेत्यांच्या नाना तऱ्हा

**- वासंती मुदकण्णा** (मिनिआपोलिस, मिनेसोटा)



*(काळ १९९०च्या दशकातला. मी टेल्कोतून ऑफिस कामानिमित्त तीन महिन्याच्या काँट्रॅक्टवर ऑस्ट्रेलियात आले, पण तेथे येऊन मला वर्ष होत आले होते. तेव्हाचे कार खरेदीचे हे अनुभव!)*

पहिली गाडी एका तरुण मुलीची होती. माझा कार्यालयीन सहकारी- नरेनने आपली गाडी दिलेल्या पत्त्यावर थांबवली. घरासमोर बाग होती, पण फुलांपेक्षा गवत आणि तणच जास्त होते. घर दुमजली होते. वरच्या मजल्यावर जायला असणाऱ्या पायऱ्या बाहेरून आणि घराच्या पुढच्या बाजूला होत्या; जणू काही ते आत जिना बांधायला विसरले होते आणि चूक लक्षात आल्यावर मग जिथे जागा दिसली तिथे त्यांनी पायऱ्या बांधल्या होत्या. मी बेल वाजवली. एका माणसाने दार उघडले. मी गाडी पाहायला आल्याचे कळल्यावर तो म्हणाला, "गाडी माझ्या मुलीची आहे. जिन्यावरून वर जा". वर गेल्यावर एका तरुण मुलीने काही प्रश्न न विचारता गाडीची किल्ली माझ्या हातात दिली आणि रस्त्यावर लावलेल्या एका मोडकळीला आलेल्या गाडीकडे इशारा करून "ती गाडी विकायची आहे" असे म्हणून ती आत निघून गेली. आमची वरात मग जिना उतरून खाली आली आणि कुजबुज सुरू झाली. जाहिरातदार गाडी चालवून बघायला द्यायचे पण गाडीत स्वतःही बरोबर यायचे. ह्या मुलीने आमच्याबरोबर यायचे सोडा आमचे नावगाव काही विचारले नव्हते. आम्ही गाडी घेऊन पळून गेलो असतो तर तिने काय केले असते? गाडी अगदी मोडकळीला आली होती. गाडी चालवून पाहिली तर ठीक वाटली. किंमत मात्र ३९०० डॉलर होती. ही किंमत माझ्या बजेटमधे असली तरी फक्त किंमत पाहून गाडी घेण्यात काही अर्थ नाही; उद्या बंद पडली तर काय, या विचाराने मी किल्ली परत केली. त्यावर त्या मुलीने काहीही विचारले नाही. ती मुलगी म्हणजे अलिप्तपणाचा कहर होता!

दुसरी गाडी एक हिरवी डॅटसन होती. ती बहुतेक नुकतीच रंगवलेली असावी, कारण तिचा रंग अगदी छान होता. गाडी सुरू केली तर एकदम घरघर सुरू झाली. जरा वेग वाढवला तर तिची घरघर आणखीनच जोरात ऐकू येऊ लागली. तिथून आम्ही जास्त वेळ न घालवता ब्रन्सविकला गेलो. एकमेकांना लागून लहान लहान जुनी घरे, आवारात पडलेला कचरा किंवा जुनी अवजारे, खराब रस्ते वगैरे पाहून आमच्या लक्षात आले, की मेलबर्नच्या उत्तरेला असलेली ही वस्ती फारशी चांगली नाही. जाहिरातदार एक पुरुष होता. त्याने दार उघडले आणि आम्हाला आतील दृश्य दिसले. ते घर एका तुर्की कुटुंबाचे होते. खोलीत बऱ्याच बायका आणि पुरुष बसले होते. अनेक मुले हुंदडत होती. जमिनीवर गडद लाल रंगाचा गालिचा घरातल्या खुर्च्या, सोफे आणि सगळी सजावटच तुर्की होती.त्या पुरुषाने खिशातून गाडीची किल्ली काढली आणि दूर रस्त्यावर लावलेल्या एक गडद लाल रंगाच्या डॅटसनकडे तो आम्हाला घेऊन गेला.

मेलबर्नमधे नुकताच आलेला टेल्कोतील माझा वरिष्ठ सहकारी नरेन म्हणाला, "गाडी छान दिसते आहे". मी मान डोलावत इतरांकडे पाहिले. त्यांचेही तेच मत असल्याचे मला जाणवले. आम्ही सगळे गाडीत बसलो आणि मी गाडी फिरवून पाहिली. रॉड आणि जिम माझ्याबरोबर असले, की तेच गाडी चालवून पाहायचे कारण मला ऑस्ट्रेलियात गाडी चालवायचा अनुभव नव्हता. पण आज मात्र चारही गाड्या मीच चालवून पाहिल्या होत्या. नरेनला त्याच्या काँट्रॅक्टप्रमाणे कंपनीकडून गाडी मिळाली होती आणि तो रोज ती चालवत होता. आता पण तो आम्हाला त्याच्या गाडीतून घेऊन आला होता. पण मी गाडी विकत घेण्यासाठी पहात असताना ती टेस्ट करण्याची इच्छा त्याने एकदाही व्यक्त केली नाही. एक वर्षभर एकटी राहून मला दुसऱ्यांवर फारसे अवलंबून राहता येत नाही ह्याची जाणीव झाली होती. तसेच, मी गरज पडली तर मदत मागायलाही शिकले होते. गाडी ठीक होती पण मी पुढचे पाऊल न उचलण्याचे ठरवले. एकतर किंमत मला परवडण्यासारखी नव्हती आणि दुसरे म्हणजे का कुणास ठाऊक, मला गाडीचा मालक जरा लबाड वाटला. खरे म्हणजे आतापर्यंत त्याच्या वागण्यात कुठेच लबाडी दिसली नव्हती. पण तुर्की लोकांशी व्यवहार करायला मला नकोसे वाटले. नंतर मला जाणवले, मीदेखील रॉड प्रमाणेच पुरावा नसताना तुर्की लोकांबद्दल वाईट समज करून घेतला होता.

बऱ्याच गाड्या पाहून झाल्या होत्या. आणखी गाड्या पाहायच्या म्हणजे परत लोकांना त्रास द्यायचा, म्हणून मी गाडी खरेदी करण्याचा विचार तात्पुरता मनातून काढून टाकला. दर तीन महिन्यांनी टेल्कोतील लोक माझे ऑस्ट्रेलियातील कामाचे काँट्रॅक्ट वाढवत होते. सगळीच अनिश्चितता होती. एक गाडी मात्र माझ्या मनात घर करून बसली होती, रेजरवॉर मधली टोयोटा करोना. एक दिवस मी सहज त्या माणसाला फोन केला आणि तो चक्क म्हणाला, की गाडी अजून विकली नाहीये. मी त्याला सांगितले, की मी उद्या बोलायला परत येते, तोपर्यंत गाडी विकू नकोस. तो म्हणाला, की तो फक्त एक दिवस थांबू शकेल.

दुसऱ्या दिवशी शनिवार होता. मी भल्या पहाटे उठून रेल्वे-स्टेशनवर गेले तर कळलं, की त्या दिवशी मेट्रोचा संप होता पण बससेवा सुरू होती. जाणे तर जरुरीचे होते. मी तासाभरानंतर आलेल्या बसमध्ये चढले. डुगूडुगू करत प्रत्येक थांब्यावर थांबत बस रेजरवॉरजवळच्या उपनगरात दीड तासाने पोचली. तिथून दुसरी बस घेऊन शेवटी दुपारी तीन वाजता मी रेजरवॉरला पोचले. मग चालत त्या माणसाच्या घरी पोहोचून त्याला सांगितले, की मी गाडी घ्यायला तयार आहे पण आधी गाडी मेकॅनिककडून तपासून घेणार आहे. त्याला डिपॉझिटची रक्कम देऊन अमेयच्या घरी गेले. तो मला त्याच्या मेकॅनिककडे घेऊन गेला. मी मेकॅनिकला पैसे आणि गाडीचा पत्ता दिला. रात्री अमेयच्या घरी राहिले. दुसऱ्या दिवशी मेकॅनिकला भेटले. तो म्हणाला, गाडीत तक्रार करण्यासारखे काही नाहीये. हे ऐकून मला

आनंद झाला! पटकन मी गाडीच्या मालकाकडे जाऊन त्याला ४,४५० डॉलरचा चेक दिला. तो फारच चांगला होता. म्हणाला, “मी पेन्शनर असल्यामुळे गाडीचे रेजिस्ट्रेशन माझ्या नावाने करायला मला अर्धे शुल्क म्हणजे फक्त १३७ डॉलर लागतील, म्हणून ते काम मी करतो”. २५० डॉलरची स्टॅम्प ड्युटी मात्र मला भरायला लागली. आतापर्यंत आयुष्यात माझ्या हिमतीवर मी साडी पण खरेदी केली नव्हती आणि आता मी चक्क गाडी घेतली होती! मला खरंच वाटेना. गाडी खरेदीसाठी इतरांनी मदत केली होती पण सगळे प्रयत्न व निर्णय माझेच होते.

सोमवारी मी रॉयल ऑटोमोटिव्ह क्लब ऑफ व्हिक्टोरिया या कंपनीत ८०० डॉलर इन्शुरन्स करता भरले, रेजरवॉरहून गाडी ईस्ट मॉलव्हर्नला घेऊन आले आणि माझे आयुष्य एकदम बदलून गेले! आता सकाळी उठून थंडी-पावसात स्टेशन पर्यंत चालत जायला आणि संध्याकाळी ऑफिसातून लोकल पकडण्यासाठी धावपळ करावी लागत नव्हती. आठवड्याचे सामान एकदम आणता येत होते. जेव्हा गाडी नव्हती तेव्हा एकदा मी कुणाला तरी जेवायला बोलावले होते. शनिवारी सकाळी कोल्स ह्या सूपरमार्केटमधून खूप भाजीपाला आणि फळे विकत घेतली आणि तीनचार पिशव्या हातात धरून मी घरी चालत निघाले. दहाएक मिनिटांचच अंतर होते पण वेव्हर्ली रस्ता मोठा असल्यामुळे मी अर्धा रस्ता पार केला आणि गाड्या जाईपर्यंत मधल्या विभाजकाजवळ उभी राहिले. पण दुर्दैव म्हणजे संत्री असलेली प्लास्टिकची पिशवी फाटली आणि सगळी संत्री रस्त्यावर पसरली. काही संत्री गोळा करून दुसऱ्या पिशवीत भरून मी घरी गेले. आता असले प्रसंग येणार नव्हते! एका शुक्रवारी संध्याकाळी घराचे भाडे भरायला गाडी घेऊन निघाले. सरळसोट पण टेकड्या असल्यामुळे लाटांसारख्या खालीवर होणाऱ्या रस्त्यावरून आशा भोंसलेची गाणी ऐकत गाडी चालवताना मला आनंदात तरंगत असल्यासारखे वाटले आणि आई, बाबा आणि माझी बहीण मीना यांची तीव्रतेने आठवण झाली.

ऑफिसात सगळ्यांनी चांगली गाडी शोधून काढली म्हणून माझे कौतुक केले. जिम म्हणाला, “यू हॅव डन वेल फॉर यौरसेल्फ”. मला स्वतःचा खूप अभिमान वाटला. आता गाडी तर होती पण माझे भारतातून आणलेले इंटरनॅशनल ड्रायव्हिंग परमिट संपत आले होते. त्यामुळे इथले ड्रायव्हिंग लायसेन्स काढणे जरुरीचे झाले. मी पटकन लर्नर्स लायसेन्स काढले. पण ह्याचा परिणाम म्हणजे मला गाडी एकटीला चालवता येईना. कायदा असा होता, की गाडी शिकत असताना गाडीवर पुढे आणि मागे ‘एल’ चा बोर्ड लावून एका पूर्ण लायसेन्स असलेल्या व्यक्तीला घेऊनच शिकाऊ चालकाला गाडी चालवता येते. आता मी ऑफिसला जाताना कोणा ना कोणा सहकाऱ्याकडे जाऊन त्याला घेऊन माझ्या गाडीच्या पुढे आणि मागे बोर्ड लावून ऑफिसात दोघे मिळून जाऊ लागले. मग घरी येताना तसाच उलटा प्रवास व्हायचा.

एका शनिवारी रॉड मला साऊथ ईस्टर्न आर्टीरिअल या फ्रीवेवर घेऊन गेला. फ्रीवेवर गाड्या ताशी शंभर किलोमीटर वेगाने जायच्या. म्हणून आतापर्यंत मी फ्रीवेवर गेले नव्हते. रॉडला शेजारी बसवून मी बर्क रोडवरून फ्रीवेकडे जाऊ लागले. जसा फ्रीवे जवळ येऊ लागला तसे माझ्या छातीचे ठोके वाढू लागले. रॉड म्हणाला, “डोन्ट वरी. इन्क्रीज यौर स्पीड”. मी वेग वाढवला आणि फ्रीवेवरच्या दोन गाड्यांमध्ये त्यांच्याच वेगाने घुसले. आता मी पण वेगाने वाहणाऱ्या नदीत जणू काही वाहवत चालले होते. दोन क्षण गेले. मग मला रॉडचा आवाज ऐकू आला, “यू डिड इट!” मी त्याच्याकडे पाहिले. त्याचे निळे डोळे चमकत होते. “यू कॅन ब्रीद नॉव”, तो म्हणत होता. मी एक दीर्घ निःश्वास सोडला आणि गाडीच्या चाकावरचे हात थोडे ढिले केले. आता कुठेही गाडी चालवण्याचा मला आत्मविश्वास मिळाला होता. घरी पोचल्यावर मी रॉडला म्हणाले, “तू घाबरला कसा नाहीस? जर अपघात झाला असता तर?” त्यावर, तो नुसताच हसला.

***

# आई

**- प्रिया गोडबोले** ( एडिसन, न्यू जर्सी)



लाडकी असे बघ प्रिय माझी ती आई
नसे दुसरी कुणी तिच्यासम बाई

तान्हुली मी असता करी हातचा झुला
हळूवार झुळूक अन् बंद पापणी फुला

मग पडे धडपडे बोलत चालत स्वारी
कौतुके बघे ती नजर रोखुनी सारी

शाळेतील गमती वा असो गुणांचा तक्ता
राग-लोभाची एकमेव ती वक्ता

तिच्या 'नाहीं'नी कितीदा मन हिरमुसले
पण तेच योग्य हे दशकांनंतर उमजले

अव्यक्त भावना डोळ्यांनी ओळखणारी
‘गरुडभरारी वाट बघे’ हे तीच सांगणारी

कधी निराशा कधी यशाची कहाणी
साथ आईची सफलतेची निशाणी

तिचीच शिकवण पिढी पुढची जाणुनी
ज्योत चिरंतन ठेवी तेवित जपुनी

असो कुठलेही वय धाक तिचा कायमचा
पण पाठीवरती हात सदा मायेचा

पुरत नाही दिन एकच आईसाठी
आजन्म बांधुया मातृवात्सल्य गाठीं

नको देव, देवीशी तुलना करुया
केवळ आईच सर्वव्यापी वंदुया !

***

**- May 14, 2023 -**

**Happy Mother’s Day !**




## मराठी भाषकांसाठी मनोरंजनाचा अद्‌भुत नवा खेळ

आवाहन:- कोणत्याही भाषेत अशी रचना करणे शक्य आहे का, की त्या रचनेमधील शब्दांची फोड केल्याने नवीन अर्थपूर्ण आशय निर्माण होऊ शकेल? मराठी भाषेत हा प्रयोग गंमतीचा व सहजसाध्य असावा या अंदाजाने हा खटाटोप! अशी रचना म्हणीसारखी संक्षिप्त, विशेष अर्थपूर्ण किंवा गहन विचारप्रवर्तक असल्यास अधिक छान!

**- अरविंद नारळे** (टोरांटो, कॅनडा)

(वृत्त चाल वसंततिलका)

**शिष्यास आज गुरुचा पटला विचार**
(शिष्याला आज गुरूचा विचार मान्य झाला.)
(शब्दफोड करून)
**शिष्यास आज गुरु चापट लावि चार**
(शिष्याला आज गुरू चार चापटा लावतो. )

***

**- विनता कुलकर्णी** (शिकागो, इलिनॉय)

अरविंद नारळेंच्या वरील दोन पंक्तिंवर आधारित **वसंततिलका वृत्तात** माझ्या काही ओळींची भर:

निष्क्रीय शिष्य रमतो, नच शिक्षणात ।
चोवीस तास करितो, व्यय आळसात |
**शिष्यास आज गुरु चापट लावि चार**
होऊनिया खजिल तो, उमजे मनात |
**शिष्यांस आज गुरुचा, पटला विचार**
अध्यापनातुन घडे, नवज्ञानवंत ॥

---

जाणां अता नियम हा, 'छडिचा-उगार,
चेल्यांस चापट, गुन्हा! नवकायद्यात' ॥

***



टीप: - "शब्दफोड" खेळात भाग घेण्यांस इच्छुक असणाऱ्यांनी आपली रचना arvind.narale@sympatico.ca आणि vinata@gmail.com या ईमेल पत्त्यांवर महिन्याच्या २० तारखेपर्यंत, आपले नांव, गांव यांच्या उल्लेखासह पाठवावी. त्यातील अर्थपूर्ण व उत्तेजनार्थ रचना बृ. म. वृत्ताच्या पुढील अंकात प्रकाशित करण्यात येतील. .

- या सदरातील चित्रे अरविंद नारळे यांची निर्मिती आहे.

***

## बृहन्महाराष्ट्र वृत्त- ऑनलाईन विभाग

**पुरवणी – पृष्ठ १४-१५**
**- लेख:- एक नवीन 'Wordle'- प्राकृत - अद्वैत फडके** (मॉर्गन हिल, कॅलिफोर्निया)
**https://bmmonline.org/vrutta-supplements/**

**राशिभविष्य:- मे २०२३ - दादा दामले** (न्यू जर्सी)
**https://bmmonline.org/rashi-bhavishya/**

**NAMASKAR** 🙏

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status. An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape. India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very
expensive.

We welcome repatriation of after-tax sales proceeds of realty by US Citizens of Indian origin. We will honor remittance of tuition fees by parents to colleges in the USA for their children from India.

**FSC is the answer.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org", for more detail.**

**Or email to Admin@SmallCharity.Org .**

You will hear from Ramesh Sarva, CPA, 183 Broadway, #210, Hicksville NY 11801

## Join Donor List:

| | |
|---|---|
| JAGDISH & SHUBHANGI THAKUR | SWAROOP YOG & OTHER CHARITIES |
| RAVI & NILIMA BHIRUD | M. KARVE FONDN 16 NEW GIRLS EDU |
| RAHUL & PUNAM MUTHA | ANAND RISHI Hosp. C T SCAN |
| KOTESWARA RAO KUNDA, MD | EDUCATIONAL FOUNDATION, A.P. |
| KIRAN& NNDINI JOAG | V.T. PATIL FOUNDATION |
| KISHOR DANDEKAR | AMPTE FOUNDATIO |
| SUBHASH & VASANTI PURANIK | CASP, V.S. SAMITHI, PUNE, PATHAK RST |
| SUHASINI JOSHI | KOSMIC BEATS |
| KAMLAKAR &ARUNA PENDSE | ATHASHREE |
| PRAMILA SARVA | ADHAR |
| VIJAY NARINGREKAR | EDUCTION |
| MUKUND & SHAILA DIDOLAKE | AKKA DHOPESWAR MAHILA MANDAL |
| GOVIND & BHAKTI NADKARNI | SHANTA DUEGA TEMPLE, KAVLEM, GOA |
| | LD ENGG COLLEGE, LIBRARY REDEVALOPMENT |
| SHARAD PANJAPE | ATHASHREE, IMROVE FACILITIES FOR SENIORS |
| KAMALAKAR PENDSE | ATHASHREE |
| SUHASINI JOSHI | COSMIC BEATS |

बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

**Subscription Remittance Address:**

**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**


बृहन्महाराष्ट्र मंडळ



**नाते जुळते मनाशी मनाचे**




*Reshimgathee*

**A BMM Matrimonial Initiative for Maharashtrians in North America**

https://reshimgathee.bmmonline.org/




Five-level "Marathi Language Learning" progressive curriculum, study guidelines, and supporting materials the BMM-Bharati Vidyapeeth's joint certificates for "Marathi Bhasha" examinations after successful completion of each level and passing criteria.

For BMM Marathi Shala Inquiries,
Email:- shala@bmmonline.org
https://bmmshala.net/

# बृहन्महाराष्ट्र वृत्त - पुरवणी

## मे, २०२३

### - (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)-

https://bmmonline.org/vrutta-supplements/

# एक नवीन ‘Wordle’

**- अद्वैत फडके** (मॉर्गन हिल, कॅलिफोर्निया)



“Wordle” हा जगप्रसिद्ध खेळ तुम्हाला नक्कीच परिचित असेल. दररोज अनेक लोक हा खेळ The New York Times च्या संकेतस्थळावर (website) खेळतात. Josh Wardle ह्याने सर्वप्रथम त्याच्या परिचितांसाठी हा खेळ तयार केला होता. त्याने हा खेळ सर्वप्रथम ऑक्टोबर २०२१ मध्ये प्रसिद्ध केला. जानेवारी २०२२ मध्ये ’द न्यू यॉर्क टाईम्स’ने त्याचे अधिकार विकत घेतले, आणि सर्वांसाठी तो खेळ त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला. हा अतिशय सोपा व मनोरंजक खेळ आहे.

एकदा मी Wordle खेळत असताना मला मराठी Wordle तयार करण्याची कल्पना सुचली. यासाठी ‘शब्दक’ हे संकेतस्थळ जरी असले तरी mobile app उपलब्ध नसल्याचे माझ्या लक्षात आले. म्हणून मी माझा हायस्कूलचा अभ्यास सांभाळून ‘प्राकृत’ नावाचे iOS mobile app तयार केले. ‘प्राकृत’ सर्व मराठी भाषकांसाठी Apple app store वर उपलब्ध आहे व ते विनामूल्य download करून सुलभतेने मराठीत Wordle खेळता येऊ शकते. हे App download करण्यासाठी संकेतस्थळ: **https://tinyurl.com/4ew7d4wk**

हा खेळ सर्वांना खूप आवडला व तो Android वरही उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आली. म्हणून, मी Android चेही app तयार केले. ते तुम्ही विनामूल्य Google Play Store वरुन download करू शकता: **https://tinyurl.com/36hm38cp**


विशेषतः लहान मुलांना मराठी भाषेचे प्रेम उत्पन्न व्हावे व हे करीत असतांना खेळाचा आनंदही घेता यावा या दुहेरी उद्देशाने केलेला हा प्रयत्न!

हे app अगदी न्यू यॉर्क टाईम्सच्या Wordle सारखेच आहे. ह्या app मध्ये हा खेळ कसा खेळायचा ह्याची सविस्तर माहिती दिली आहे. प्रत्येक खेळाचे योग्य ते मूल्यमापनही त्वरित उपलब्ध करून देण्यात येते. आपापल्या आवडीनुसार हा खेळ खेळतांना विविध सोयी दिलेल्या आहे. उदाहरणार्थ, रंगसंगती (color theme) किंवा काठिण्याची पातळी (difficulty level) या सारखे पर्याय दिले आहेत. ‘सरल’ पातळी निवडून खेळ खेळतांना सोपे शब्द (काना, मात्रा, वेलांटी, इत्यादी विरहित) ओळखायचे असतात. तर ‘कठीण’ पातळी निवडून खेळतांना, जोडाक्षरे सोडल्यास मराठीतील सर्व शब्दांचा समावेश करण्यात आला आहे. मराठी भाषेतील वर्ण हे व्यंजन व स्वर एकत्र मिळून तयार होत असल्याने व सर्व व्यंजने व स्वर उपलब्ध असलेला कळफलक (keyboard) खेळाच्या या आवृत्तीत नसल्याने, कठीण पातळीवर खेळताना टंकलिखित वर्णात स्वर आपोआप मिसळून घेतला जातो. उदाहरणार्थ, जर टंकलिखित शब्द "व" असेल, पण गुपित शब्दात "वि" असेल, तर ते आपोआप "व" चे "वि" केल्या जाते.

गुपित शब्द ओळखल्यानंतर होणारा आनंद व किती कमीत कमी प्रयत्नांमध्ये तुम्ही तो ओळखला, हे इतरांना दाखविण्याची (Social Media वर पाठविण्याची) फारच सुंदर व सुलभ सोय केलेली आहे. याने खेळाचा आनंद द्विगुणित होईल असा विश्वास वाटतो! उदाहरणार्थ, **काही निवडक screen shots पुढील पानावर दिलेले आहेत.**

भविष्यात data science या तंत्रज्ञानाचा वापर करून app मध्ये अत्याधुनिकता आणण्याचा प्रयत्न राहील. मराठी पुस्तकांच्या PDF scan व parse करून स्वतंत्र शब्दकोष तयार करणे, त्याचबरोबर शब्दाचा अर्थ, शब्दाचा वाक्यात उपयोग व शब्दासंबंधित अधिक माहिती जसे की, शब्दाचा वापर कालांतराने कसा बदलत गेला, कोणत्या संदर्भात तो शब्द वापरल्या जातो, इत्यादी उपयुक्त माहिती उपलब्ध करून देण्यात येईल. तुम्हाला हा खेळ नक्की आवडेल असा विश्वास वाटतो. ‘प्राकृत’चा आनंद घ्या व काही सुधारणा असल्यास जरूर कळवा.


धन्यवाद!




***

## एक नवीन ‘Wordle’







### Android:

